महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: एचटीआर-०९२१/प्र.क्र.४८/२०२३/जाहिरात दिनांक : १२ नोव्हेंबर,२०२४

# -: शुद्धिपत्रक :-

## विविध विषयांतील सहयोगी प्राध्यापक, महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षण सेवा, गट-अ, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय

## जाहिरात क्रमांक: ०४९/२०२३

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातील तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील **विविध विषयांतील सहयोगी प्राध्यापक, महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ** या संवर्गातील पद भरती करीता आयोगामार्फत दिनांक १ सप्टेंबर, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ अनुसार राज्याच्या नियंत्रणाखालील पदांवरील नियुक्तीकरीता सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहित करण्यात आली असून सदर अधिनियमातील तरतुदी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी २०२४/प्र.क्र.७५/१६-क, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अनुसार प्रस्तुत संवर्गाच्या विज्ञापित जाहिरातीकरीता लागू आहेत. प्रस्तुत प्रकरणी सामाजिक व शैक्षणिक शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण निश्चिती करून सुधारित मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनास कळविण्यात आले होते. त्यास अनुसरून शासनाद्वारे सुधारित मागणीपत्र पाठविले आहे. त्यानुसार संबंधित जाहिरातीमधील पदांचा सामाजिक / समांतर आरक्षणाचा तपशील खालीलप्रमाणे राहील:-

**२. उपलब्ध पदसंख्या:- ११५**

**२.१ भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सा. व शै. मा. वर्ग | आ.दु.घ | एकूण आरक्षित | अराखीव (खुला) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण पदे | १२ | ११ | ०४ | ०२ | ०४ | ०३ | ०३ | २३ | १२ | १२ | ८६ | २९ | ११५ |
| सर्वसाधारण | ०७ | ०७ | ०३ | ०१ | ०३ | ०२ | ०२ | १५ | ०७ | ०७ | ५४ | १९ | ७३ |
| महिला | ०४ | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०७ | ०४ | ०४ | २७ | ०९ | ३६ |
| खेळाडू | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | ०१ | ०५ | ०१ | ०६ |
| अनाथ | ०१- संस्थात्मक | | | | | | | | | | | | |
| दिव्यांग | एकूण ११५ पदांपैकी ०४ पदे दिव्यांग- अस्थीव्यंगता/मेंदूचा पक्षाघात/कुष्ठरोग मुक्त/शारीरिक वाढ खुंटणे/आम्ल हल्लाग्रस्त/स्नायु विकृती | | | | | | | | | | | | |

**३. भरावयाच्या पदांचा विषयनिहाय तपशील:-** महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ अनुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये / संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या संवर्गनिहाय आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने, शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०१९/प्र.क्र.९४/१९/विशि-१, दिनांक ११ एप्रिल, २०२२ अन्वये पदभरतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. त्यानुसार भरावयाच्या विषयनिहाय पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | विषय | भरावयाची पदसंख्या | अ. क्र. | विषय | भरावयाची पदसंख्या | अ. क्र. | विषय | भरावयाची पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्थापत्य अभियांत्रिकी | २१ | ५ | अणुविद्युत व दूरसंचरण अभियांत्रिकी | २२ | ९ | अन्न तंत्रशास्त्र | ०२ |
| २ | यंत्र अभियांत्रिकी | ०८ | ६ | संगणक अभियांत्रिकी/विज्ञान | २० | १० | एम.सी.ए. | ०३ |
| ३ | विद्युत अभियांत्रिकी | १८ | ७ | माहिती तंत्रज्ञान | ०७ | ११ | स्वयंचल अभियांत्रिकी | ०२ |
| ४ | उपयोजित यंत्रशास्त्र | ०६ | ८ | उपकरणीकरण अभियांत्रिकी | ०६ | | | |

**४.** शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशाच्या अनुषंगाने, सदर मूळ जाहिरातींस अनुसरून अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील आरक्षणाचा लाभ घ्यावयाच्या असल्यास त्याबाबतचा विकल्प सादर करणे आवश्यक ठरते.

**५.** काही उमदेवारांनी त्यांच्याकडील कुणबी नोंदीच्या आधारे इतर मागास वर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाल्याचे नमूद करुन इतर मागास वर्गाचा विकल्प सादर करण्याची विनंती केली होती. त्यास अनुसरुन शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः संकीर्ण २०२४/प्र.क्र.१३७/आरक्षण-०५, दिनांक २८ मे, २०२४ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार, अराखीव किंवा आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातून अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी इतर मागास वर्गाचे (OBC) जात प्रमाणपत्र प्राप्त केले असल्यास, अशा उमेदवारांना इतर मागास वर्गाचा (OBC) दावा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ज्या उमेदवारांनी इतर मागास वर्गाचे (OBC) जात प्रमाणपत्र प्राप्त केले आहे, अशा उमेदवारांनी इतर मागास वर्गाचा दावा करण्यासाठी विकल्प सादर करणे आवश्यक ठरते.

**६.** आयोगामार्फत यापूर्वी सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग अधिनियम २०२४ यास अनुसरून इतर संवर्गासाठी प्रसिद्ध केलेल्या शुद्धिपत्रकांच्या अनुषंगाने सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग / इतर मागास वर्ग हे विकल्प निवडण्याची मुभा दिलेल्या कालावधीत बऱ्याच उमेदवारांकडे सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग / इतर मागास वर्ग प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळविण्यास काही अडचणी आल्या असल्याची निवेदने प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने ज्या उमेदवारांकडे सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग / इतर मागास वर्ग प्रवर्गाचे प्रमाणपत्र नसल्यामुळे त्यांनी त्यांच्याकडील आर्थिक दृष्टया दुर्बल घटक वर्गवारीचे प्रमाणपत्राआधारे त्यांचा मूळ अर्जातील दावा कायम ठेवला आहे अशा उमेदवारांबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत शासनाचे अभिप्राय मागविण्यात आले होते. त्यास अनुसरून शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण २०२४/प्र.क्र.१३७/आरक्षण-०५, दिनांक १२ जुलै, २०२४ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ अन्वये ज्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाचे तसेच शासन निर्णय, दिनांक ०७ सप्टेंबर, २०२३ च्या अनुषंगाने गठित करण्यात आलेल्या समितीच्या शिफारशीनुसार इतर मागास वर्गाचे जात प्रमाणपत्र उपलब्ध झालेल्या उमेदवारांना आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गाचा लाभ अनुज्ञेय नाही. त्यामुळे सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग/ इतर मागास वर्ग प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तसेच इतर कोणत्याही मागास प्रवर्गास आर्थिक दृष्टया दुर्बल घटकाचा विकल्प अनुज्ञेय नाही.

**७.** आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या **प्रस्तुत जाहिरातींकरिता** अर्जाद्वारे फक्त अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून अर्ज केलेल्या उमेदवारांना इतर मागास वर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करण्याकरीता विकल्प सादर करणे तसेच अराखीव (खुला) मधील उमेदवार जे मूळ जाहिरातीकरीता **वयाधिक ठरल्याने** अर्ज सादर करू शकले नाहीत, अशा इतर मागास वर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील उमेदवारांनी नव्याने अर्ज सादर करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे :-

(१) संबंधित उमेदवार आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईल मधील “My Account” सदराखाली प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीकरीता उपलब्ध करून देण्यात आलेल्या Link समोर दर्शविण्यात आलेल्या “Question ” या बटनावर क्लिक करून विचारण्यात येणारी माहिती नमूद करून विकल्प सादर करू शकतील.

(२) इतर मागास वर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग दावा करण्याकरीता विकल्प सादर केल्यास संबंधित उमेदवाराचा मूळ अर्जातील दावा रद्द समजण्यात येईल.

(३) इतर मागास वर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा विकल्प सादर केलेल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) चा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

(४) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचे (SEBC) अथवा इतर मागास वर्गाचे (OBC) जात प्रमाणपत्र मिळाले आहे अशा, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातून (EWS) दावा केलेल्या उमेदवारांनी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा (SEBC) अथवा इतर मागास वर्गाचा (OBC) विकल्प सादर न केल्यास सदर उमेदवारांचा आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS) दावा ग्राह्य धरण्यात येणार नाही. तसेच सदर दावा बदलण्याची विनंती भरती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर मान्य करण्यात येणार नाही.

(५) इतर मागस वर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गासाच्या आरक्षणामुळे मागासवर्गीयांकरीता अनुज्ञेय असलेल्या वयोमर्यादेतील सवलतीस अनुसरून नव्याने पात्र ठरणारे उमेदवार ऑनलाईन अर्जप्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईल मधील My Account सदराखाली प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीकरीता उपलब्ध करून देण्यात आलेल्या Link च्या आधारे इतर मागस वर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातून अर्ज सादर करू शकतील.

(६) संबंधित परीक्षेकरीता अर्जाद्वारे अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचा दावा केलेल्या उमेदवाराने इतर मागास वर्ग किंवा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग आरक्षणातून लाभ घेण्याकरीता विकल्प सादर करणे तसेच नव्याने अर्ज सादर करण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे करणे आवश्यक आहे :-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करावयाचा कालावधी | दिनांक १४ नोव्हेंबर, २०२४ रोजी १४.०० ते<br>दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४ ०२४ रोजी २३.५९ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक | दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४ २४ रोजी २३.५९ |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४ रोजी २३.५९ |
| ४ | चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०२ डिसेंबर, २०२४ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये |

**८.** कमाल वयोमर्यादा गणण्याचा दिनांक व शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव गणण्याचा कालावधी हा मूळ जाहिरातीमध्ये नमूद दिनांकानुसारच गणण्यात येईल.

**९.** **विविध विषयांतील सहयोगी प्राध्यापक, महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ (जा.क्र. ०४९/२०२३)** करीता कमाल वयोमर्यादा दिनांक ०१ जानेवारी, २०२४ व शैक्षणिक अर्हता व अनुभव गणण्याचा दिनांक मूळ जाहिरातीनुसार **दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ (अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांक)** असा राहील.

**१०.** **विविध विषयांतील सहयोगी प्राध्यापक, महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ (जा.क्र. ०४९/२०२३)** करीता इतर मागास वर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करण्यासाठी विकल्प सादर करणाऱ्या तसेच नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांचे जात प्रमाणपत्र सदर शुद्धीपत्रकाच्या विहित अंतिम दिनांकापूर्वीचे म्हणजेच **दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४** पूर्वीचे असणे आवश्यक आहे.

**११.** प्रस्तुत पदाच्या मुळ जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज स्वीकारताना उमेदवारांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार ते कोणत्या विषयासाठी अर्ज करीत आहेत, याबाबत त्यांच्या विषयांचा विकल्प घेण्यात आलेला नाही. याकरीता खालीलप्रमाणे विषयांचा विकल्प सादर करणे आवश्यक आहे :-

(i) विषयांकित संवर्गाकरीता महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ अनुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या संवर्गनिहाय आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने, शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०१९/प्र.क्र.९४/१९/विशि-१, दिनांक ११ एप्रिल, २०२२ अन्वये पदभरतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येणार आहे. यास्तव, विषयाधीन संवर्गाकरीता अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांनी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार/विकल्प निवडण्याकरीता **दिनांक १४ नोव्हेंबर, २०२४ ते दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४** या कालावधीमध्ये ऑनलाईन अर्ज प्रणालीमध्ये व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(ii) विषयाचा विकल्प निवडीकरीता उमेदवारांनी त्यांच्या प्रोफाइलमधील My Account मध्ये जाऊन अर्ज केलेल्या संवर्गाच्या जाहिरातीची निवड करून त्यामधील Question हे बटन निवडून त्यात नमूद केलेले विषयाचा विकल्प निवडणे आवश्यक आहे. एकदा विषय निवडून Select बटन अंतिम केल्यानंतर पुन्हा विषयाच्या विकल्पामध्ये दुरूस्ती/सुधारणा करता येणार नाही. उमेदवारांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार निवडलेले विषय अंतिम समजण्यात येवून त्या विषयाकरीता त्यांचा विचार करण्यात येईल.

(iii) जाहिरातीस अनुसरुन अर्ज केलेल्या संबंधित उमेदवारांना त्यांच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक तसेच Email ID वर SMS/Email व्दारे सूचित करण्यात येईल सद्यस्थितीत अर्ज केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेली शैक्षणिक अर्हता आणि त्यांनी निवडलेल्या विषयांचे विकल्प याची पात्रता न तपासता विकल्प स्वीकरण्यात येत आहेत. विहित कालावधीत उमेदवारांनी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार विषय निवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास, उमेदवाराने त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार विषय निश्चित करून त्यानुसार त्यांचा विषयाचा विकल्प ठरविण्यात येईल.

(iv) उमेदवारांनी निवडलेले विषय आणि त्यांच्या अर्जातील शैक्षणिक अर्हता न तपासता विषयनिहाय विकल्प स्वीकारण्यात येत असून अर्जांची छाननी करताना उमेदवारांना पात्र/अपात्र ठरविण्यात येईल.

(v) नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमदेवारांनी विषयाचा विकल्प सादर करणे अनिवार्य राहील.

**१२.** प्रस्तुत संवर्गाकरीता इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करणाऱ्या तसेच नव्याने अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी सन २०२३-२०२४ अथवा २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात वैध असणारे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (NCL) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**१३**. उपरोक्त कार्यपद्धती सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या आरक्षणाच्या अनुषंगाने **मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्रमांक ३४६८/२०२४ तसेच त्याअनुषंगिक इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील. विविध विषयांतील सहयोगी प्राध्यापक, महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये (जा.क्र. ४९/२०२३)** च्या मूळ जाहिरातीस व दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या शुद्धीपत्रकातील तरतुदी लागू राहतील.

**१४.** दिनांक ०१ सप्टेंबर, २०२३ रोजी प्रसिद्ध मूळ जाहिरातीमधील तसेच, दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ व दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या शुद्धीपत्रकामधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

उप सचिव, (जाहिरात)

ठिकाण : नवी मुंबई.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग